## कॉन्व्हसेशन्स

भावसार यांच्या चित्रांचे प्रदर्शन अपार्चर इंडिया प्लाझा, पहिला मजला, फर्ग्युसन महाविद्यालयासमोर आले आहे. १७ ऑगस्टपर्यंत सकाळी ११ ते ते खुले राहील.

## शिक्षण

द मुळीक; तसेच विलास कुलकर्णी यांच्या लरंग प्रशिक्षण कार्यशाळा ऑगस्टमध्ये होणार आहे. ७०६, ३२५११४६३

## त्रकला वर्ग

लरीतर्फे वारली आणि जलरंग चित्रकला प्रशिक्षण संपर्क : २५६६२८५४ किंवा ९८९०६७९७१०

## ल्लीची' आज प्रकाशन

: छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आग्राभेटीचा . विठ्ठलराव चेकेलिखित 'मोहीम दिल्लीची' या १५ ऑगस्टला नामदेव कार्यालय, बुधवार पेठ वल यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. छत्रपतींचा आग्र्याला न असावा, याबाबत मांडू पाहणारी ही काल्पनिक 'उमा पब्लिकेशन'तर्फे प्रकाशित होत आहे.

## वा रविवारी कार्यक्रम

: गुरुपौर्णिमेनिमित्त पं. मुकुंद मराठे आणि शिष्यांचा शास्त्रीय गायन-वादनाचा कार्यक्रम १७ ऑगस्टला ता विष्णुप्रसाद सभागृह, राहाळकर राम मंदिरामागे, णार आहे. डॉ. न. म. जोशी, डॉ. आनंद यादव, बरे या वेळी उपस्थित राहणार आहेत.

---

पुरस्कार अखिल भारतीय श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्सचे अध्यक्ष कांतिलाल जैन यांना वनमंत्री बबनराव पाचपुते यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी अभय कोठारी होते. स्थायी समिती अध्यक्ष श्याम देशपांडे, विजयकांत कोठारी, दिलीप कोठारी, रमण कोठारी आदी या वेळी उपस्थित होते.

श्री. पाचपुते म्हणाले, "माणसाने समाजाचे ऋण विसरू नये. जैन समाजाने 'समाजभूषण पुरस्कारा'साठी श्री. जैन यांची केलेली निवड योग्य असून, त्यांच्या चांगल्या कार्याची दखल समाजाने घेतली आहे."



**श्री महावीर प्रतिष्ठान सभागृह :** कांतिलाल जैन यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान करताना वनमंत्री बबनराव पाचपुते. स्थायी समिती अध्यक्ष श्याम देशपांडे, अभय कोठारी, विजयकांत कोठारी, रमण कोठारी आदी उपस्थित होते.

अनिल लुंकड व पूनम देसर्डा यांनी श्री. जैन यांना दिलेल्या सन्मानपत्राचे वाचन केले. जैन समाजातील बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार व सुभाष लुंकड यांच्या 'जैन संदेश' अंकाचे प्रकाशन या वेळी करण्यात आले. 'ग्रुप'चे अध्यक्ष संतोष भुरट यांनी प्रास्ताविक केले. विजय मर्लेचा यांनी सूत्रसंचालन केले.

---

# सौंदर्यवृद्धीसाठी 'कॉस्मेटिक सर्जरी'चा पर्याय

## टिळक रस्ता : नव्या 'रिव्हायव्हल लेझर सेंटर'चे आज उद्घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

पुणे, ता. १४ : 'माझं नाक सरळ व्हायला हवं', 'ओठांचा आकार जरा मोठाच आहे', 'चेहऱ्यावर खळी पडली असती तर...', 'पोट कमी करण्यासाठी काय करायचं...' असे प्रश्न पडणाऱ्या आणि स्वतःच्या सौंदर्यासाठी धडपडणाऱ्या तरुणांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, त्यांना 'कॉस्मेटिक सर्जरी'चा उत्तम पर्याय मिळाला आहे. त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी पहिल्यांदाच त्वचाविकारतज्ज्ञ आणि कॉस्मेटिक सर्जन यांनी एकत्र येऊन 'रिव्हायव्हल लेझर अँड कॉस्मेटिक सर्जरी सेंटर' सुरू केले आहे.

या सेंटरची सुरवात कॉस्मेटिक सर्जन डॉ. पराग सहस्रबुद्धे, डॉ. अविनाश देवधर, त्वचाविकारतज्ज्ञ डॉ. स्मिता इंगळे आणि डॉ. तेजल गुळे यांनी केली असून, येत्या शुक्रवारी (ता. १५) टिळक रस्त्यावर सेंटरचे उद्घाटन होणार आहे.

या संदर्भात डॉ. सहस्रबुद्धे म्हणाले, "व्यक्तिमत्त्वाविषयीच्या संकल्पना बदलल्याने तसेच हे उपचार सर्वसामान्यांच्या आवाक्यात आल्याने तरुणांचे 'कॉस्मेटिक सर्जरी'कडे वळण्याचे प्रमाण वाढले आहे. वाकडे नाक सरळ करणे, टक्कल आणि त्यांवरील उपाय, ओठांचा आकार लहान करण्यासाठी, कर्करोगामुळे स्तनाची शस्त्रक्रिया झाली असेल तर ते पूर्ववत करणे, चरबी वाढली असेल तर कमी करणे, चेहऱ्यावरचे व्रण घालविण्यासाठी ही उपचार पद्धती वापरली जाते. याहून वेगळे म्हणजे खळी पाडून हवी आहे, चेहऱ्यावरच्या सुरकुत्या कमी करण्यासाठी, स्तनाचा आकार वाढविणे, तसेच पोट कमी करण्यासाठी जास्त व्यक्ती येतात."

उपचारांसाठी येणाऱ्यांमध्ये कॉल सेंटर, आयटी, मॅनेजमेंट कंपन्यांमधील तरुणांचे प्रमाण अधिक आहे. साधारणतः विशीपासून ते पन्नाशीच्या वयोगटातील व्यक्तींचा समावेश आहे. केवळ महिलाच नव्हे, तर पुरुषांचेही प्रमाण अधिक आहे. याचाच फायदा घेऊन अलीकडे अनेकदा चेहऱ्यावरील व्रण घालवून देतो, आठ दिवसांत वजन कमी करा, असे गैरसमज करून वैद्यकीय अभ्यास नसलेल्या व्यक्ती हे उपचार करताना आढळून येत आहेत. त्यामुळे तरुणांनी शस्त्रक्रियेपूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेतला पाहिजे. आपल्याला नक्की कोणत्या अवयवांमध्ये बदल करून हवे आहेत, ते आपल्या शरीरयष्टीला योग्य दिसतील का, याची खात्री करूनच शस्त्रक्रिया करावी," असे डॉ. सहस्रबुद्धे यांनी आवाहन केले.

---

पुणे, ता. १४ : "प्रशासनाच्या अनागोंदी कारभाराचा अनुभव आल्याने प्रशासनाने मंजूर केलेल्या सर्वच बांधकाम आराखड्यांचा आढावा घेण्यात येणार आहे," अशी माहिती पुणे ... यांचे उपाध्यक्ष प्रसाद केदारी

०३.०० ०३.३० ०८.३० १०.०

...म्हणाले, "लष्कर परिसरातील ...दायक घरांच्या दुरुस्तीला ...न्यास बोर्ड प्रशासन टाळाटाळ ... याबाबत येथील नागरिकांच्या ...मोठ्या प्रमाणात तक्रारी आहेत. मात्र

---

## 'पोस्टल पॉलि... सोमवारी उद्घ...

पुणे, ता. १४ : टपाल खाते आणि ओरिएंटल विमा कंपनी यांच्यातर्फे 'ओरिएंटल पोस्टल पर्सनल ॲक्सिडेंट पॉलिसी'चे येत्या सोमवारी (ता. १८) औपचारिक उद्घाटन करण्यात येणार आहे, अशी माहिती शहरातील मुख्य टपाल कार्यालयाचे वरिष्ठ पोस्ट मास्टर अविनाश देशमुख यांनी दिली.

पोस्टात खाते असणाऱ्यांना पंधरा रुपये भरून एक लाख रुपयांचा विमा एक

---

## 'जिजामाता'तर्फे ब...

पुणे, ता. १४ : जिजामाता महिला सहकारी बँकेची वार्षिक सभा नुकतीच झाली. या वेळी सभासदांसाठी बारा टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. बँकेच्या ठेवींत मार्च २००८ अखेर एकतीस